# समाज कल्याण विभाग

# जिल्हा परिषद उस्मानाबाद

# जिल्हा परिषद सेस योजना.

# जिल्हा परिषद सेस योजना.

जि.प. स्तरावर राबविण्यात येणा-या योजना. शासन निर्णय क्र ग्रापप्र-1093/54/प्रक्र/ 1239/34 अ दिनांक 01/09/1993 अन्वये मागासवर्गीयाच्या उन्नतीसाठी 20 टक्के राखुन ठेवने आवश्यक.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार मागासवर्गीयासाठी 20 टक्के निधी राखून ठेवण्यासाठी गृहीत धरावयाच्या उत्पन्नाच्या बाबी.

1. कलम 157 खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर व शुल्क.
2. कमल 155 (1) नुसार जमीन महसुल उपकरात होणारी वाढ.
3. कलम 144,151 व 152 126 अवये बसविलेला जमीन उपकर.
4. उपकर सापेक्ष अनुदान
5. कलम 158(3) खाली मिळणारे मुद्रांक शुल्क अनुदान (पंचायतीचा वाटा वगळून).
6. कलम 150 (2), 151ए (3), व 152-एक(3) अन्वये देय असलेले पाणी पट्टीवरील उपकरापासूनचे उत्पन्न

## घेण्यात येणा-या योजना.

1. मागासवर्गीयासाठी शेतकऱ्यांना एच डि ई पी पाईप (100%अनुदानावर).
2. मागासवर्गीयासाठी शेतकऱ्यांना 5 एच पी पाणबुडी मोटार वाटप करणे (100%अनुदानावर).

**सन 2018-19 मध्ये समाज कल्याण विभागामार्फत 5 टक्के अपंगासाठी राखीव निधीतून व जिल्हा अपंग निधीतून खालील प्रमाणे वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येणार आहेत.**

1. **मतिमंद व्यक्तीना आर्थिक सहाय्य (रू 10000/-मर्यादा).**
2. **अपंग व्यक्तीना स्वंयरोजगारासाठी झेरॉक्स मशिनसाठी अर्थ सहाय्य देणेबाबत.**
3. **अपंग शेतक-यांना एच.डी.पी.ई पाईप / 5 एच.पी.पाणबुडी पुरवठा करणे**
4. **अपंग विद्यार्थी व अपंग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे**
5. **अपंगाचे कल्याणार्थ जिल्हा स्तरीय क्रिडा स्पर्धाचे आयोजन**
6. **अपंग प्रमाण पत्र वितरीत करण्याकरिता विशेष मोहिम शिबीराचे आयोजन करणे**
7. **अपंग विद्यार्थी व अपंग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे**
8. **सार्वजनिक स्वच्छता, शाळामध्ये मुलीसाठी शौचालये, शाळामध्ये अपंगासाठी विशेष शौचालये**

# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

# अपंग कल्याण योजना

**समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांचे अधिनस्त असलेल्या अपंग कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविधि योजनांची माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.**

**1.अस्थिविकलांगासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान --**

**शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना अतीतिव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेत शिक्षण घेवू शकत नाहीत.अशा अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून अस्थिविकलांग विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा / कार्यशाळा निवासी स्वरूपाच्या असून निवासी शाळेमध्ये भौतिकोउपचार, शिक्षण,निवास,भोजनाची विनामुल्य सोय आहे.**

**अटी व शर्ती 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,**

**2.फोटो-2,**

3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित अस्थिव्यंग शाळा-07 कार्यशाळा-02 अशा एकूण-09 शाळा व कार्यशाळा कार्यरत आहेत. सदरच्या शाळा / कार्यशाळेमध्ये एकूण - 366 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**2.मनोविकलांगासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार मतिमंद,मनोविकलांग अनाथ मतिमंद बालगृह व शाळेतील विद्यार्थी / विद्यार्थिंनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा / मतिमंद बालगृहे निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण,निवास,भोजनाची विनामुल्य सोय आहे.

अटी व शर्ती 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,

2.फोटो-2,

3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित मतिमंद शाळा-05,मतिमंद अनाथ बालगृहे-02 व कायम स्वरूपी विना अनुदानित -01 अशा एकूण-08 शाळा व बालगृहे कार्यरत आहेत. सदरच्या शाळा / बालगृहामध्ये एकूण- 229 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**3.मुकबधिरासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार मुकबधिर,कर्णबधिर विद्यार्थी / विद्यार्थिंनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण, निवास, भोजनाची विनामुल्य सोय आहे.

अटी व शर्ती 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,

2.फोटो-2,

3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित मुकबधिर,कर्णबधिर शाळा-10 कार्यरत आहेत. सदरच्या शाळेमध्ये एकूण - 416 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**4.अंधासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार अंध विद्यार्थी / विद्यार्थिनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण, निवास, भोजनाची विनामुल्य सोय आहे.

अटी व शर्ती 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,

2.फोटो-2,

3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित अंध 01 शाळा कार्यरत आहे. सदर शाळेमध्ये एकूण - 54 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**5.शालांत पुर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना-**

शासन निर्णय क्र.अपंग-2013/प्र.क्र.91/अ.क.2,दिनांक-30 ऑगष्ट,2014 नुसार सामान्य शाळेमध्ये तसेच अपंगांच्या अनिवासी शाळेमध्ये इयत्ता 1 ते 10 पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण इयत्ता 1 ते 4 थी दरमहा रूपये -100/-,इयत्ता 5वी ते 7 वी दरमहा 150/- व इयत्ता 8 वी ते 10 वी दरमहा रू.200/- शिष्यवृत्ती दिली जाते.

अटी व शर्ती-1अपंगत्वाचा दाखला (40% पेक्षा जास्त असलेला सिव्हील सर्जन यांचेकडील),

2.मागील वर्षाचे गुणपत्रक,

3.बॅंकेचे पासबुक झेरॉक्स

**6.शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची-**

शासन निर्णय क्र.अपंग-2013/प्र.क्र.91/अ.क.2,दिनांक-30 ऑगष्ट,2014 नुसार इयत्ता 10 वी नंतरचे महाविद्यालयीन, व्यावसयीक,तांत्रीक व अभियंत्रीकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्याक्रमांच्या दर्जाप्रमाणे अभ्यास क्रमांचे गट करून दरमहा शिष्यतीची रक्कम देण्यात येते.त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता

तसेच सर्व अपंग विद्‌यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क,प्रकल्प टंकलेखन खर्च,अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.(इ.11 वी व 12 वी प्रथम वर्ष-230 रूपये दरमहा,व्दीतीय व तृतिय वर्ष-300/- दरमहा एम.ए.व इतर व्यवसाईक अभ्यास क्रम-530/- दरमहा )

सदर योजनेचा लाभ घेणेसाठी अपंग विद्‌यार्थ्यांनी आपल्या शाळेमार्फत / कॉलेजमार्फत अर्ज या कार्यालयाकडे सादर करावेत.

अटी व शर्ती-1.अपंगत्वाचा दाखला (40% पेक्षा जास्त असलेला सिव्हील सर्जन यांचेकडील),

2.मागील वर्षाचे गुणपत्रक,

3.बॅकेचे पासबुक झेरॉक्स

<u>7.लघु उद्‌योगासाठी शरिरीक दृष्टया अपंग व्यक्तींना पुनर्वसनासाठी अर्थसाहय देणे-</u>

शासन निर्णय क्र.अपंग-2008/प्र.क्र.2008/प्र.क्र.212/सुधार-3,दिनांक-02 जुलै,2010 नुसार 18-50 वर्षे वयोगटातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रक्कम रूपये 150,000/- च्या व्यवसायासाठी 80% बँकेमार्फत कर्ज व 20% अथवा कमाल रू.30,000/- अुनदान स्वरूपात दिले जाते.

अटी व शर्ती-

1.अपंगत्वाचा दाखल,

2.व्यवसायाचे कोटेशन

3.अपंग व्यक्ती करू इच्छित असलेल्या व्यवसायाचे प्रोजेक्ट रिपोर्ट.

4.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

5.वार्षिक उत्पन्न रू.1,00,000/-पेक्षा कमी असल्याचा तहसिलदार यांचा दाखला,

6.दोन प्रतिष्ठित व्यक्तींची नावे.

7. जागेचा 7/12,8-अ, भाडेपटटा

8.दोन आयकार्ड साईज छायाचित्रे (फोटो),

9.सुवाच्छ व पूर्णपणे भरलेला प्रस्ताव दोन प्रतीत,

10.प्रस्तावावर सुवाच्छ अक्षरात जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेचे नाव लिहावे.

जिल्हयामध्ये जानेवारी,2016-17 अखेर 21 लाभार्थ्यांनी लाभ देण्यात आलेला आहे.

8. अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना-

समाजातील अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे आपले कौटुंबीक जीवन व्यतीत करता यावे यासाठी अपंग व अपंगत्व नसलेल्या व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन दिल्यास निश्चितपणे अपंग व्यक्तींशी अपंगत्व नसलेल्या व्यक्ती विवाह करण्यास प्रोत्साहीत होते. यासाठी शासन निर्णय क्र. अपंग-2013/प्र.क्र. 103/अ.क्र.2 दिनांक-17 जून 2014 अन्वये अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याच्या योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. योजनेची मार्गदर्शक तत्वे/सुचना खालील प्रमाणे आहेत.

1) अपंग व अव्यंग विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना किमान 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींशी अपंगत्व नसलेल्या सुदृढ व्यक्तीने विवाह केल्यास त्या जोडण्यास सदर योजना लागू आहे.
2) दिनांक 1 एप्रिल 2014 या अर्थीक वर्षापासून नव्याने विवाहित जोडप्यांना सदर योजना लागू होईल.
3) किमान 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंग नसलेल्या वधू किंवा वराने अपंग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास खालील प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल
   अ) रक्कम रुपये 25,000/- चे बचत प्रमाणपत्र
   आ) रक्कम रुपये 20,000/- रोख स्वरुपात
   इ) रुपये 4,500/- संसार उपयोगी साहित्य/वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.
   ई) रुपये 500/- स्वागत समारंभाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल.
4) सदर योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.
   I) वधू अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान 40% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे.
   II) अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
   III) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा. वधू अथवा वर घटस्फोटीत असल्सास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.
   IV) विवाह हा कायदेशीर रित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

V) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

## 9. अपंग व्यक्तीना ओळखपत्र देणे

अपंग कल्याण योजनेचा लाभ घेणेसाठी अपंग व्यक्तींना ओळख पत्र देणेत येतात.अपंग व्यक्तीना दिलेल्या ओळख पत्रांचे आधारे एस.टी.प्रवास भाडयाचे अपंग व्यक्तीस 75% व त्याच्या सोबत असणाऱ्या व्यक्तींस 50 % सवलत देणेत येते

सदर योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

1. वैदयकिय प्रमाणपत्र. (मंडळाचे-तीन डॉक्ट्रर यांच्या सहीचे)
2. आधारकार्ड/ रहिवाशी/रेशनकार्ड/ मतदान कार्ड (या पैकी एक)
3. दोन फोटो.
4. वयाचा दाखला